RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ५६(२)] गुरुवार, ऑगस्ट १३, २०२६/श्रावण २२, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक १३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**नगरविकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ जुलै २०२६.

**सूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-२४२५/११२५/प्र.क्र.१३८/२०२५/सूचना/निदेश/नवि-१३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरिता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख "उक्त युडीसीपीआर नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो. व प्रायो./कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/ नवि-१३, दि. २/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त युडीसीपीआर नियमावली दि. ३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त युडीसीपीआर नियमावलीमधील विनियम क्र.४.११ (xxxi) या तरतूदीनुसार शेती तथा ना-विकास विभाग या वापर विभागामध्ये फटाके/स्फोटके यांचे उत्पादन आणि मॅगझिन/स्फोटके यांची साठवणूक करणे हा वापर गावठाण वस्ती किंवा गावठाण सीमेपासून २ किमीपेक्षा जास्त अंतराबाहेरील शेत जमिनींवर अनुज्ञेय करण्यात आला असून, सदर वापर हा ‘मुख्य स्फोटके नियंत्रक’ **(Chief Controller of Explosives)** यांच्याकडून ‘ना-हरकत प्रमाणपत्र’ **(NOC)** मिळण्याच्या अटीवर अनुज्ञेय आहे;

आणि ज्याअर्थी, मा.उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठाच्या याचिका क्र.११७७/२०२० मधील दि. २.१२.२०२१ रोजीच्या निर्णयाच्या अनुषंगाने पाहता, तसेच सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून उक्त युडीसीपीआर नियमावलीमधील मधील विनियम क्र.४.११ (xxxi) या विनियमामध्ये **(सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार)** सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले असून त्यासाठी उक्त युडीसीपीआर नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आलेला आहे);

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) (क) व कलम २०(३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तदनुषंगिक शक्तींचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिद्ध करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित

विभागीय सहसंचालक, नगररचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगररचना यांना प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे “अधिकारी” म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात येत आहे);

**परिशिष्ट-अ**

**शासन सूचना क्र. टिपीएस-२४२५/११२५/प्र.क्र.१३८/२०२५/सूचना/निदेश/नवि-१३, दिनांक ८.०७.२०२६ सोबतचे सहपत्र**

**The Regulation No. 4.11 (xxxi) of the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) is proposed to be modified as follows –**

| Regulation No. | Existing Provision | Proposed Modification |
|---|---|---|
| **Regulation No. 4.11 (xxxi)** | Manufacturing of Fireworks / Explosives and Storage of Magazine / Explosives beyond **2 km.** of Gaothan Settlement / Gaothan Boundary subject to No Objection Certificate from the Chief Controller of Explosives. | Manufacturing of Fireworks / Explosives and Storage of Magazine / Explosives beyond **1.5 km.** of Gaothan Settlement / Gaothan Boundary subject to No Objection Certificate from the Chief Controller of Explosives.” |

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरिता जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

(१) विभागीय सहसंचालक, नगररचना, कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / अमरावती / छत्रपती संभाजीनगर विभाग.

(२) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)

(३) सर्व जिल्हाधिकारी

(४) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

(५) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

(६) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

(७) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि., मुंबई.

(८) मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

(९) सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे / नवनगर विकास प्राधिकरणे.

(१०) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

तसेच, शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४(१) अन्वये नव्याने निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक) चे उप-कलम (ग) व कलम २०(४) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासनाचे अंतिम मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल व त्यामधील तरतुदी राज्यस्तरावर लगोलग अंमलात येतील.

ही सूचना / निदेश शासनाचे संकेतस्थळ *www.maharashtra.gov.in* (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**प्रणव कर्पे,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 8th July 2026.

### Notice

THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

No.TPS-2425/1125/CR.138/2025/Notice/Directives/UD-13.— Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) (hereinafter referred to as "the said UDCPR Regulations") for the state except Municipal Corporation of Greater Mumbai, & some Planning Authorities under the provisions of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.TPS-1818/ CR.238/18/DP. & RP./Sec.37 (1AA) (*c*) & sec.20(4)/UD-13, dated 02/12/2020 and the said UDCPR regulations are come into force from dt.03.12.2020;

And whereas, in accordance with the provision of Regulation No.4.11 (xxxi) of the said UDCPR Regulations, the Manufacture of Firecrackers / Explosives and the Storage of Magazines / Explosives is permitted in the Agricultural / No-Development Zone on the Agricultural lands situated at a distance of more than 2 km from a Gaothan settlement or Gaothan Boundary, subject to the condition of obtaining a 'No Objection Certificate' (NOC) from the 'Chief Controller of Explosives';

And whereas, in view of the decision dated 02.12.2021 delivered by the Hon'ble High Court of Bombay, Nagpur Bench, in Writ Petition No. 1177/2020, and considering the larger public interest, the State Government is of the opinion that it is necessary to amend to amend Regulation No. 4.11 (xxxi) of the said UDCPR Regulations (as per Appendix-A attached herewith), and consequently, it has become necessary to amend the said UDCPR Regulations (hereinafter referred to as "the said Modification");

Now therefore, in exercise of the powers conferred under section 37(1AA)(*a*) and section 20(*3*) of the said Act and all other powers enabling in that behalf, the State Government hereby publishes a notice for inviting suggestions/objections from general public in respect to the said modification. Any objections/suggestions upon the said modification shall be forwarded, before the expiry of one month from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette*, to the concerned Divisional Joint Director of Town Planning who is hereby authorised as "an Officer" to hear objections/ suggestions and say of concerned Planning Authorities, as applicable, and submit his report to the Government (hereinafter referred to as "the said Officer").

### Annexure - A

**Accompaniment of Notice No.TPS-2425/1125/CR.138/2025/ Notice/Directives/UD-13, dated 08.07.2026**

**The Regulation No. 4.11 (xxxi) of the Unified Development Control and Promotion Regulations (UDCPR) is proposed to be modified as follows –**

| Regulation No. | Existing Provision | Proposed Modification |
|---|---|---|
| **Regulation No. 4.11 (xxxi)** | Manufacturing of Fireworks / Explosives and Storage of Magazine / Explosives beyond **2 km.** of Gaothan Settlement / Gaothan Boundary subject to No Objection Certificate from the Chief Controller of Explosives. | Manufacturing of Fireworks / Explosives and Storage of Magazine / Explosives beyond **1.5 km.** of Gaothan Settlement / Gaothan Boundary subject to No Objection Certificate from the Chief Controller of Explosives." |

This **Notice** is kept for inspection to the general public in the following offices for the period of one month on all working days.

1. The Divisional Joint Director of Town Planning, Konkan / Pune/ Nagpur / Nashik / Amravati / Chhatrapati Sambhaji Nagar Division.
2. The Commissioners All concerned Municipal Corporations. (Except Brihinmumbai Municipal Corporation).
3. All Collectors.
4. Chairman, Improvement Trust, Nagpur.
5. The Metropolitan Commissioners, All Metropolitan Regions Developments Authorities.
6. Office of the Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Belapur, Navi Mumbai.
7. Office of the Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd., 8 Floor, World Trade Centre, Mumbai-5.
8. Chief Executive Officer, Mumbai Metropolitan Region Slum Rehabilitation Authority.
9. All Special Planning Authorities New Town Development Authorities.
10. The Chief Officers, All Municipal Councils/ Nagar Panchyats.

Further, the State Government hereby issues directives under Section 154(*1*) of the said Act that, till the final approval to the said proposed modification and proposed regulations under clause (*c*) of Section 37(1AA) and Section 20(*4*) of the said Act is pending by the Government, the proposed modification shall immediately come into force.

This Notice / Directives are also available on the Government website *www.maharashtra.gov.in* (Acts / Rules).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.